महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(AGovt. of Maharashtra Undertaking)
CIN:U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
फॅक्स नं. : २६४७५८१४
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग,
प्लॉट जी-९, प्रकाशगड, ४था मजला
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

जा.क्र. : औसंवि/ब/ -22837

दिनांक : 22 MAY 2015

# परिपत्रक

**विषय : कंपनीचे काम करीत असताना कर्मचाऱ्यास झालेल्या प्राणांकित / अप्राणांकित अपघात प्रकरणी नुकसान भरपाई प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याबाबत.**

**********

म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित अंतर्गत कंपनीचे काम करीत असताना कर्मचाऱ्यांना झालेल्या प्राणांकित / अप्राणांकित अपघाताची नुकसान भरपाईची प्रकरणे क्षेत्रीय कार्यालयातील विविध विभागीय / मंडल / परिमंडल कार्यालयांकडे कोणत्याही कार्यवाहीविना प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

याबाबत मा. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, त्यांनी दिलेल्या निर्देशान्वये ज्या कार्यालयांकडे कर्मचाऱ्यांची नुकसान भरपाईची प्रकरणे प्रलंबित असतील, त्यांनी सदर प्रलंबित प्रकरणे दि. ३१/०५/२०१५ पर्यंत निर्णयांकित करावीत. सदर प्रकरणे निकाली काढताना कर्मचारी नुकसान भरपाई कायदा १९२३ मधील संबंधीत तरतुदींचा अवलंब करुन कायद्यानुसार विहित कालावधीत प्रकरणे निकाली काढावीत.

ज्या कार्यालयाकडे कर्मचारी नुकसान भरपाईची प्रकरणे प्रलंबित राहतील त्या विभागाच्या संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, तसेच त्यांचे मासिक वेतन थांबविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ. मुरहरी केळे)
**कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी )**

प्रती : कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जाच्या अधिकाऱ्यांपर्यंत.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :
१) मा. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, मुंबई.
२) संचालक (संचलन), महावितरण, मुंबई.
३) संचालक (वित्त), महावितरण, मुंबई.
४) संचालक (प्रकल्प), महावितरण, मुंबई.

D:\back up meena\Meena\PDRAJA\apaghta pratipurti.doc